# ग्रामीण बंधू: चला,
# शेतकरी मित्रांना पुढे नेऊया

## बायोफ्युएलसर्कल आणि ग्रामीण बंधू:

बायोफ्युयलसर्कल हे एक ऑनलाईन व्यासपीठ आणि बाजारपेठ आहे ज्यामार्फत शेतकरी आपला शेत कचरा म्हणजेच बायोमास त्वरित विकू शकतात. या व्यतिरिक्त ह्या शेत कचऱ्याची / बायोमासची वाहतूक करणे, बायोमास साठवून ठेवण्यास जागा भाड्याने देणे किंवा बायोमासपासून ब्रिकेट/पेलेट बनवण्याचे लघु उद्योग सुरु करु शकतात.
हे व्यासपीठ म्हणजे अशा अनेक सुविधांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी व त्या सुविधा शेतकरी मित्रांपर्यंत पोहचवण्यासाठी ग्रामीण बंधूंशी ऋणानुबंध जोडण्याचा बायोफ्युएलसर्कलचा प्रकल्प आहे.



## ग्रामीण बंधू म्हणजे कोण ?

नावाप्रमाणे ग्रामीण बंधू हे आपल्या सारखे प्रतिष्ठित, विश्वासार्ह  होतकरू व्यक्तिमत्व आहे ज्यांना आपल्या गावाचा व शेतकरी बांधवांचा विकास आणि आर्थिक प्रगती करण्यात सहभागी होण्याची इच्छा आहे. तसेच ग्रामीण बंधु बनून आपण स्वत:साठी देखील अधिक उत्पन्नाचा एक स्रोत निर्माण करू शकता.



## ग्रामीण बंधू म्हणून आपली भूमिका काय असेल?

- बायोफ्युएलसर्कलच्या सर्व सुविधांबद्दल शेतकऱ्यांमध्ये जागृती/ प्रसार/ प्रचार/ प्रसिद्धी करणे. हे आपण आपल्या गावात तसेच आसपासच्या इतर गावांमध्ये/ पंचक्रोशीत करू शकता.
- जास्तीत जास्त लोकांना त्यांचा बायोमास (शेतकचरा) बायोफ्युएलसर्कलमार्फत विक्री करायला प्रोत्साहित करणे.
- बायोफ्युएलसर्कल घडवून आणत असलेल्या सामाजिक व आर्थिक क्रांती आणि बदलांबद्दल जागरूकता निर्माण करणे.
- जास्तीत जास्त शेतकऱ्यांना/ संभाव्य उद्योजकांना बायोफ्युएलसर्कल प्लॅटफॉर्मवर नोंदवून घेणे. तसेच नोंदणीकृत शेतकऱ्यांची देखरेख करणे, नेहमी त्यांच्या संपर्कात राहणे व दर महिन्याला रिपोर्ट बनवून बायोफ्युएलसर्कलकडे जमा करणे.
- असे उमेदवार शोधणे जे पुढील कामे करू शकतात:

### बायोमासचे एकत्रीकरण व जमवाजमव

(एखादी व्यक्ती जी गावातील सर्वच शेतजमिनींमधील बायोमास गोळा करून त्याची वाहतूक बायोफ्युएलसर्कल स्टोअर पर्यंत करू शकते.)

### बायोमास साठवण

(एखाद्या व्यक्तीकडे जर घराजवळ रिकामी जागा, पडीक शेत जमीन किंवा माळरान असेल तर त्याचा उपयोग बायोमास स्टोअरेज मध्ये होऊ शकतो  त्या व्यक्तीस बायोफ्युएलसर्कलमार्फत सेटअप करण्यास आर्थिक सहाय्य* मिळेल.)

### ब्रिकेट/ पेलेट बनविण्यास सक्षम

(एखाद्या व्यक्तीकडे मुबलक जागा, वीज आणि पाण्याची सोय असेल तर ब्रिकेट/ पेलेट बनविण्याचे एक युनिट सेट केले जाऊ शकते. त्या व्यक्तीस सेटअप करण्यास बायोफ्युएलसर्कलमार्फत आर्थिक सहाय्य* मिळेल.)

## ग्रामीण बंधू होण्यात आपला काय फायदा आहे ?

ग्रामीण बंधु म्हणून काम केल्यास तुम्हाला आपल्या शेतकरी बांधवांची मदत आणि विकास केल्याचा आनंद आणि अभिमान तर नक्कीच होईल परंतू यातून आपला आर्थिक फायदा देखील होईल. तुम्ही तुमची भूमिका यशस्वीरीत्या पार पाडल्यास आणि सोपवलेली कामगिरी फत्ते केल्यास बायोफ्युएलसर्कलकडून योग्य मानधन मिळेल.

## प्रगती तुमची, मदत आमची!

*अटी लागू. कर्जाची रक्कम फायनान्सिंग पार्टनरच्या निर्णयावर अवलंबून असेल.